| | |
|---|---|
| **भाग — 'अ'**<br>**(न्यायनिर्णयाचे शिर्ष पृष्ठ)**<br>**(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२))** | |
| MHWS010016702023 | **अतिरीक्त सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे न्यायालय**<br>**(पीठासीन अधिकारी, श्रीमती व्ही.डी.इंगळे )**<br>**(न्यायनिर्णय दि.०९/०४/२०२६)**<br><br>**वि.ख.बाल संरक्षण क्र.७५/२०२३**<br>**निशाणी क्र.८०** |
| | प्रथम खबरी अहवाल/गुन्हा व पोलीस ठाणेचा तपशिल अपराध क्र.३५०/२०२३, पोलीस ठाणे शिरपुर, ता.मालेगांव, जि. वाशिम. |
| तक्रारदार/फिर्यादी | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे शिरपुर,<br>ता.मालेगांव, जि. वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती. एस. पी. कुलकर्णी. |
| आरोपी | **१. मारोती पंढरीनाथ वैद्य**<br>वय २७ वर्ष, व्यवसाय — चालक<br><br>**२. पंढरीनाथ ग्यानोबा वैद्य**<br>वय ५५ वर्ष, व्यवसाय — चालक<br><br>**३. सौ.अंतकला गजानन भुतेकर**<br>वय ४० वर्ष, व्यवसाय — रोजमजुरी<br><br>आ.क्र.१ व २ रा. देऊळगांव मही,<br>ता.देऊळगांव राजा, जि.बुलढाणा<br>आ.क्र.३ रा. केनवड, ता.रिसोड, जि.वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | विधीज्ञ श्री. ए.आर.देशपांडे. |

## भाग—ब

## (फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र. ४४ (२))

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि.२०/०५/२०२२. |
| प्रथम खबर अहवालची तारीख | दि.०२/१०/२०२३. |
| दोषारोप पत्राची तारीख | दि.३०/११/२०२३. |
| दोषारोप ठेवण्यात आल्याची तारीख | दि.२७/१०/२०२५. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | दि.२०/०१/२०२६. |
| न्यायनिर्णय करीता राखीव केल्याची तारीख | दि.०७/०४/२०२६. |
| न्यायनिर्णयाची तारीख | दि.०९/०४/२०२६. |
| शिक्षेची तारीख, असेल तर | निरंक. |

## आरोपींचा तपशील

| अनु. क्र. | आरोपींचे नाव | अटक तारीख | जमानत तारीख | गुन्हयाचे विवरण | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षेचा कालावधी | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार कारावासाचा अवधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मारोती पंढरीनाथ वैद्य | अटकपुर्व जामीन | अटकपुर्व जामीन | भादंवी कलम ३७६(२)(एन), व कलम ३, ४, ५, ९, १०, ११ लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२. | निर्दोष | निरंक | ...... |
| २. | पंढरीनाथ ग्यानोबा वैद्य | अटकपुर्व जामीन | अटकपुर्व जामीन | | निर्दोष | निरंक | ...... |
| ३. | सौ. अंतकला गजानन भुतेकर | अटकपुर्व जामीन | अटकपुर्व जामीन | | निर्दोष | निरंक | ...... |

## भाग—'क'

## (फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (३))
## सरकारी/आरोपीचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ. — सरकारी साक्षीदार :**

| दर्जा | नाव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १. | विकास श्रीराम नवघरे | पंच साक्षीदार |
| २. | पिडीता | पिडीता |
| ३. | अमोल पंढरीनाथ वैद्य | साक्षीदार |
| ४. | दत्तात्रय ग्यानुजी शिंदे | साक्षीदार |
| ५. | रविंद्र पांडुरंग ताले | तपास अधिकारी |

**ब. — आरोपीचे साक्षीदार :**

| दर्जा | नाव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. — न्यायालयाचे साक्षीदार :**

| दर्जा | नाव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## सरकारी/आरोपीचे/न्यायालयातील निशाणी दस्तऐवज.

### अ. — सरकारी दस्तऐवज :

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन. |
|---|---|---|
| १. | नि.क्र.४५/सा.क्र.१<br>नि.क्र.४६/सा.क्र.१<br>नि.क्र.४७/सा.क्र.१ | समन्स पत्र<br>घटनास्थळ पंचनामा<br>दुसरा घटनास्थळ पंचनामा |
| २. | नि.क्र.४९/सा.क्र.२ | छापील प्रथम खबर |
| ३. | नि.क्र.५९/सा.क्र.४<br>नि.क्र.६०/सा.क्र.४ | पिडीताचे शाळा सोडण्याचा दाखला<br>पिडीताचे दाखल खारीज रजिष्टरची प्रमाणित प्रत |
| ४. | नि.क्र.६६/सा.क्र.५<br>नि.क्र.६७/सा.क्र.५<br>नि.क्र.६८/सा.क्र.५<br>नि.क्र.६९/सा.क्र.५<br>नि.क्र.७०/सा.क्र.५<br>नि.क्र.७१/सा.क्र.५<br>नि.क्र.७२/सा.क्र.५ | घटनास्थळ पंचनामा<br>जि.सा.रू.अकोला यांना पाठविलेले पत्र<br>न्यायवैज्ञानिक शाळा, अमरावती यांना दिलेले पत्र<br>जि.सा.रू.वाशिम यांना दिलेले पत्र<br>छाया वैद्य हीच्या बयानातील अधोरेखांकीत भाग अ<br>अमोल वैद्य याच्या बयानातील अधोरेखांकीत भाग अ<br>फौ.प्र.सं.कलम १६४ चा जबाब नोंदविण्यासाठी पत्र |

### ब. — बचावपक्ष दस्ताऐवज :

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन. |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

### क. — न्यायालयीन दस्ताऐवज :

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन. |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. — साहित्य/वस्तू :**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन.** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## <u>न्यायनिर्णय</u>

**(घोषीत दिनांक ०९/०४/२०२६)**

आरोपीं विरूद्ध भारतीय दंड विधान कलम ३७६(२)(एन) आणि कलम ३ सह कलम ४, ५ सह कलम ६, ९ सह कलम १० व ११ लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये संपरिक्षा चालविण्यात आली.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :

पिडीता हीचे लग्न दि.२०/०५/२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजता तिची आई अंतकला, सासरे पंढरीनाथ वैद्य यांनी माहेरी केनवड, ता. रिसोड, जि.वाशिम येथे ती १६ वर्षाची असतांना हिंदू रितीरिवाजाप्रमाणे लाऊन दिले होते. दि.२०/०५/२०२२ रोजी लग्न झाले तेव्हापासुन ती देऊळगांव मही, ता.देऊळगांव राजा, जि.बुलडाणा येथे नांदण्यास गेली. लग्न झाल्यानंतर पासुन तिचे पती मारोती वैद्य यांनी तिच्या सोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यांच्यापासुन ती गर्भवती झाली आहे. प्रसुतीकरीता तिच्या आईने जिल्हा सामान्य रूग्णालय, अकोला येथे दि.२७/०९/२०२३ रोजी भरती केले आणि दि.२८/०९/२०२३ रोजी प्रसुती होऊन तिला मुलगी झाली आहे.

३. सदर बयानावरून पोलीस ठाणे रामदास पेठ, अकोला येथे आरोपीं विरूद्ध अपराध क्र.३८७/२०२३, भारतीय दंड विधान कलम

३७६(२)(एन), व कलम ४, ५, ६, ९, १०, ११ लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये गुन्हयाची नोंद झाली. पिडीताच्या बयानावरून गुन्हयाचे घटनास्थळ पिडीता हीचे सासरचे गांव म्हणजे केनवड, ता.रिसोड, जि.वाशिम हे असल्याने पोलीस निरीक्षक यांनी प्रस्तुतचा गुन्हा पोलीस ठाणे शिरपुर, ता.रिसोड, जि.वाशिम येथे वर्ग करण्याबाबत मा.पोलीस अधिक्षक, अकोला यांना पत्र देऊन कळविले. त्याप्रमाणे प्रस्तुतची छापील प्रथम खबर व ईतर संबंधित दस्तऐवज पोलीस ठाणे शिरपुर, जि.वाशिम येथे वर्ग करण्यात आले. पोलीस ठाणे, शिरपुर यांनी सदर दस्तऐवजांवरून ३७६(२)(एन) व कलम १०, ४, ५, ९, ११ व ६ लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये अपराध क्र.३५०/२०२३ नोंदविला. तपासी अधिकारी यांनी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, पिडीतेचे ज्या ठिकाणी लग्न झाले त्या ठिकाणी दुसरा घटनास्थळ पंचनामा तयार केला, तसेच त्यांनी ज्या ठिकाणी आरोपी व पिडीताचे शारीरिक संबंध झाले त्या ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा तयार केला, पिडीताचे वैद्यकीय कागदपत्रे हस्तगत केले, पिडीता व अमोल पंढरीनाथ वैद्य यांचे बयान नोंदविले आणि पिडीताचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम १६४ चा जबाब नोंदविण्याकरीता न्यायालयास पत्र दिले. तपासाअंती आरोपीं विरूद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाले. मी आरोपींवर निशाणी क्र.३४ अन्वये भारतीय दंड विधानचे कलम ३७६(२)(एन) व कलम ३ सह कलम ४, ५ सह कलम ६, ९ सह कलम १० व ११ लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये दोषारोप ठेवला. आरोपींनी ते नाकारले व ते निर्दोष असल्याचे प्रतिकथन केले आणि संपरीक्षेची विनंती केली.

५. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे बयाण नि.क्र.७७ ते ७९ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी वयाबाबत गैरसमजुत निर्माण झाल्यामुळे त्यांच्या विरूद्ध खोटी केस केल्याचे प्रतिकथन केले आहे.

६. मी खालीलप्रमाणे मुद्‌दे काढले. त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षांसाठीची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | मुद्‌दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, दि.२०/०५/२०२२ रोजी व त्यापुर्वी पोलीस ठाणे शिरपुर हद्‌दीत, आरोपी क्र.१ ने पिडीतेवर वारंवार बलात्कार केला आणि भा.दं.वी.चे कलम ३७६(२)(एन) अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, वर नमूद दिवशी, तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने अल्पवयीन पिडीतेवर लिंगभेदी अत्याचार केला, आणि लैंगिक गुन्हयापासुन बालकांचे संरक्षण कायदा कलम ३ सह कलम ४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने अल्पवयीन पिडीतेवर गंभीर स्वरूपाचा भेदक लैंगिक अत्याचार केला, आणि लैंगिक गुन्हयापासुन बालकांचे संरक्षण कायदा कलम ५ सह कलम ६ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.२ हे १८ वर्षावरील प्रौढ पुरूष असुन बालविवाह घडवुन आणला आणि सदर बालविवाहाचे संपादन, संचालन, दिग्दर्शन केले आणि त्यास साहाय्य केले, आणि लैंगिक गुन्हयापासुन बालकांचे संरक्षण कायदा कलम ९ सह कलम १० अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ५. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.२ जे १८ वर्षावरील प्रौढ पुरूष असुन त्यांनी बालविवाहास प्रोत्साहन दिले किंवा तो पार पाडण्यास परवानगी दिली, आणि लैंगिक गुन्हयापासुन बालकांचे संरक्षण कायदा कलम ११ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ६. | काय आदेश ? | अंतिम आदेशान्वये. |

## कारणमिमांसा

७. आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण खालीलप्रमाणे पाच साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

सा.क्र.१. विकास श्रीराम नवघरे, नि.४४

सा.क्र.२. पिडीता, नि.४८

सा.क्र.३. अमोल पंढरीनाथ वैद्य, नि.५२

सा.क्र.४. दत्तात्रय ग्यानुजी शिंदे, नि.५८

सा.क्र.५. रविंद्र पांडुरंग ताले, नि.६५

८. अभियोग पक्षास वारंवार संधी देऊनही अभियोग पक्ष ईतर साक्षीदारांना उपस्थित करण्यास अपयशी ठरले. सबब नि.१ वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. याशिवाय, अभियोग पक्षाने आपली भिस्त खालील दस्तऐवजांवर ठेवली.

| | |
|---|---|
| नि.क्र.४५/सा.क्र.१ | समन्स पत्र |
| नि.क्र.४६/सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनामा |
| नि.क्र.४७/सा.क्र.१ | दुसरा घटनास्थळ पंचनामा |
| नि.क्र.४९/सा.क्र.२ | छापील प्रथम खबर |
| नि.क्र.५९/सा.क्र.४ | पिडीताचे शाळा सोडण्याचा दाखला |
| नि.क्र.६०/सा.क्र.४ | पिडीताचे दाखल खारीज रजिष्टरची प्रमाणित प्रत |
| नि.क्र.६६/सा.क्र.५ | घटनास्थळ पंचनामा |
| नि.क्र.६७/सा.क्र.५ | जि.सा.रू.अकोला यांना पाठविलेले पत्र |
| नि.क्र.६८/सा.क्र.५ | न्यायवैज्ञानिक शाळा, अमरावती यांना दिलेले पत्र |
| नि.क्र.६९/सा.क्र.५ | जि.सा.रू.वाशिम यांना दिलेले पत्र |
| नि.क्र.७०/सा.क्र.५ | छाया वैद्य हीच्या बयानातील अधोरेखांकीत भाग अ |
| नि.क्र.७१/सा.क्र.५ | अमोल वैद्य याच्या बयानातील अधोरेखांकीत भाग अ |
| नि.क्र.७२/सा.क्र.५ | फौ.प्र.सं.कलम १६४ चा जबाब नोंदविण्यासाठी पत्र |

९. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. पी. कुलकर्णी व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.आर.देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दे क्र.१ ते ६ साठी</u> :—**

१०. मुद्दे क्र. १ ते ५ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते चर्चेसाठी एकत्रीत घेतले आहेत.

११. अभियोग पक्षाच्या कथानानुसार पिडीता ही अल्पवयीन असतांना सुद्धा आरोपी क्र.२ व ३ यांनी तिचा विवाह आरोपी क्र.१ शी बेकायदेशीररित्या लाऊन देण्यासाठी प्रोत्साहन दिले व तिचा विवाह लाऊन दिला आणि आरोपी क्र.१ ने लग्न झाल्यापासुन पिडीतेवर वारंवार बलात्कार करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

१२. सा.क्र.१ विकास नवघरे हा घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार होय. परंतु त्याने साक्षीत कथन केले की, पोलीसांनी घटनास्थळावर घटनास्थळ पंचनामा नि.४६ तयार केला होता. सा.क्र.१ विकास नवघर याने पंचनामा नि.४६ सिद्ध केला असला तरी त्याने हे नाकारले की, तो दि. १९/१०/२०२३ रोजी आरोपीच्या राहत्या घरी देऊळगांव मही, जि. बुलढाणा येथे पंचनाम्यासाठी गेला होता, तसेच त्याने दुसरा घटनास्थळ पंचनामा नि.४७ वरील त्याची सही नाकारून अभियोग पक्षास साहाय्य केले नाही. त्यामुळे दुसरा घटनास्थळ पंचनामा नि.४७ सिद्ध होऊ शकला नाही.

१३. प्रस्तुत घटनेतील मुख्य साक्षीदार, सा.क्र.२ पिडीता हीने तिच्या पुराव्यात कथन केले की, तिचे लग्न २० मे २०२२ रोजी झाले, तिची जन्म तारीख नि.१६/०६/२००३ आहे, तसेच तिच्या लग्नाच्या वेळी तिचे वय २० वर्ष होते. सा.क्र.२ पिडीता हीने दि.२०/०५/२०२२ रोजी तिचे लग्न आरोपी मारोती सोबत झाले तेव्हा ती १६ वर्षाची होती ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे अभियोग पक्षाने तिला फितुर घोषीत करून तिची उलटतपासणी घेतली. परंतु उलटतपासणीत देखील तिने लग्नाच्या वेळी ती १६ वर्षाची असल्याची बाब पुर्णपणे नाकारली आहे. पिडीता हीने तिच्या बयानातील अधोरेखांकीत भाग अ हा बरोबर नसल्याचे सांगितले आणि सदर अधोरेखांकीत भाग अ तिच्या बयानात का नमुद करण्यात आला याचे कारण

ती सांगु शकली नाही. तिने तिच्या शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रावरील जन्म तारीख दि.१६/०३/२००६ ही चुकीची असल्याचे सांगितले व तिने पोलीसांना दि.१५/११/२०२३ रोजी दिलेल्या बयानातील अधोरेखांकीत भाग अ हा देखील बरोबर नसल्याचे सांगितले आहे. आरोपीच्या वि. वकीलांनी तिची उलटतपासणीत घेतली असता पिडीताने कबुल केले की, तिचे जन्म तारीख २००६ नसुन २००३ आहे आणि तिच्या बयानातील जन्मतारीख ही तिच्या आईने सांगितल्याचे तिने पुढे कथन केले आहे. पुढे पिडीता हीने ती आरोपी सोबत सुखाचा संसार करीत असल्याचेही कथन केले आहे.

१४. सा.क्र.३ अमोल वैद्य याने फिर्यादीला दि.२८/०९/२०२३ रोजी प्रसुती होऊन मुलगी झाली तेव्हा त्यास समजले की फिर्यादीचे आरोपी मारोती सोबत जेव्हा लग्न झाले तेव्हा ती १६ वर्षाची होती, ही बाब नाकारली आहे. वि. सहाय्यक सरकारी वकीलांनी त्याची उलटतपासणी घेतली, परंतु आरोपींना अपराधात गोवणा—या बाबींचा त्याने सपशेल इंकार केला.

१५. सा.क्र.४ दत्तात्रय ग्यानुजी शिंदे हे श्री शिवाजी हायस्कुल केनवड, या ठिकाणी मुख्याध्यापक पदावर कार्यरत असुन त्याच्या साक्षीतुन दिसुन येते की, पिडीताने त्यांच्या शाळेत दि.२७/०६/२०१६ रोजी पाचव्या वर्गात प्रवेश घेतला होता, तिचा शाळा सोडल्याचा दि.३०/०४/२०२२ आहे, पिडीताच्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रानुसार तिची जन्म तारीख १६/०३/२००६ आहे, त्यांनी शाळा सोडल्याचा दाखला हा दाखल खारीज रजिष्टरवरून तयार केला होता व दाखल खारीज रजिष्टरनुसार पिडीतेची जन्म तारीख ही १६/०३/२००६ आहे. परंतु उलटतपासणीत सदर साक्षीदाराने त्यांनी केवळ अभिलेख पाहुन पिडीतेच्या जन्मतारखेबाबत सांगितले असल्याचे व प्रत्यक्षात त्यांना काहीही माहीत नसल्याचे कथन केले.

१६. अभियोग पक्षाने सा.क्र.५ रविंद्र ताले यांची साक्ष नोंदविली आहे. त्यांनी प्रस्तुत प्रकरणाचा तपास करून आरोपीं विरूद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले आहे. त्यांच्या साक्षीनुसार अपराध क्र.३५०/२०२३ मध्ये पिडीता हीची स्त्री रूग्णालय अकोला येथे प्रसुती झाली असल्याने त्यांनी तिचे बयान नोंदविल्याचे दिसते. त्यानंतर त्यांनी पिडीतेचे ज्या ठिकाणी लग्न झाले त्या ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा नि.४६ तयार केला आणि ज्या ठिकाणी आरोपी व पिडीता यांचे शारीरिक संबंध झाले त्या ठिकाणचा देखील त्यांनी घटनास्थळ पंचनामा नि.६६ तयार केला होता. त्यानंतर त्यांनी पिडीतेचे वैद्यकीय दस्तऐवज हस्तगत केले, साक्षीदारांचे बयान त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविले आणि त्यांनी पिडीतेचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम १६४ चा जबाब नोंदविण्यासाठी न्यायालयास पत्र नि.७२ दिले होते व तपासाअंती त्यांनी आरोपीं विरूद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. उलटतपासात त्यांनी पिडीता व आरोपी यांचे लग्न झाल्याचे त्यांच्या तपासात निष्पन्न झाल्याचे सांगितले.

१७. अभियोग पक्षाच्या पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, खटल्यातील मुख्य साक्षीदार पिडीता हीने अभियोग पक्षाच्या समर्थनार्थ साक्ष दिली नाही. पिडीता आणि तिचे पालक हे अभियोग पक्षाच्या बाजुचे समर्थन करीत नाहीत. आरोपींनी अल्पवयीन मुलीचे लग्न लाऊन दिले आणि आरोपी क्र.१ ने लग्नानंतर तिच्यावर वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले अशा स्वरूपाचा कोणताही आरोप त्यांनी आरोपीं विरूद्ध केलेला नाही. त्यामुळे आरोपींवर ठेवलेले आरोप सिद्ध झाल्याचे म्हणता येणार नाही. म्हणुनच मी मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आणि अंतिम निष्कर्षासाठी असलेल्या मुद्दा क्र.६ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करते.

| आदेश | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ मारोती पंढरीनाथ वैद्य, २. पंढरीनाथ ग्यानोबा वैद्य व ३. सौ.अंतकला गजानन भुतेकर यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(एन) आणि कलम ३ सह कलम ४, ५ सह कलम ६, ९ सह कलम १० व ११ लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये दंडनीय अपराधातुन, फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २३५ (१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जात मुचलके व जामीनकदबे रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ४३७(अ) अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये २५,०००/— चे जामीन बंधपत्र सादर करावे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या कक्षात उद्घोषित करण्यात आला.) |

VAISHALI DAMODAR INGLE

Digitally signed by VAISHALI DAMODAR INGLE
Date: 2026.04.09 15:58:45 +0530

(श्रीमती व्ही.डी.इंगळे)

दि.०९/०४/२०२६

अतिरीक्त सत्र न्यायाधीश, वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | R.R.Bharad, Stenographer (Grade-I) |
| Name of Court | :- | Smt.V.D.Ingle<br>District Judge-2 and Additional Sessions Judge, Washim. |
| Date of Judgment/ Order | :- | 09/04/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | :- | 09/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 09/04/2026 |